# प्रारुप सेवाप्रवेश नियम

| अनु.क्र. | पदनाम |
|---|---|
| १. | लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक(निम्नश्रेणी) व लघु-टंकलेखक |
| २. | वरिष्ठ स्वीय सहायक व निवडश्रेणी लघुलेखक |
| ३. | वरिष्ठ लिपिक |
| ४. | कनिष्ठ लिपिक-टंकलेखक |
| ५. | सहायक |
| ६. | मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी |
| ७. | उप मुख्य अधिकारी |
| ८. | विशेष भू-संपादन अधिकारी |
| ९. | सहकार अधिकारी |
| १०. | उप निबंधक, सहकारी संस्था |
| ११. | भू-मापक |
| १२. | तारतंत्री |
| १३. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| १४. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) |
| १५. | शाखा अभियंता (विद्युत) |
| १६. | शाख अभियंता (स्थापत्य) |

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक ९३] मंगळवार, ऑक्टोबर ६, २०२०/आश्विन १४, शके १९४२ [पृष्ठे ३०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.७२/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व लघु-टंकलेखक या पदावरील सेवाप्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**सेवाप्रवेश नियमाचा मसुदा**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.७२/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "लघुलेखक

(उच्चश्रेणी), लघूलेखक (निम्नश्रेणी) व लघू-टंकलेखक'' या पदावरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

**प्रारूप सेवाप्रवेश नियम**

१. (१) या नियमांस, ''लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व लघु-टंकलेखक महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, (सेवाप्रवेश) नियम,२०२०'' असे म्हणता येईल.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर.—

(अ) ''शासन'' म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) ''प्राधिकरण'' म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) ''शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र'' म्हणजे शासकीय परीक्षा मंडळाचे तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले प्रमाणपत्र आणि शासनाने या उद्देशासाठी जिला मान्यता दिलेली आहे अशी अन्य कोणतीही संस्था यांनी दिलेले प्रमाणपत्र असा आहे.

(ड) ''माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा प्रमाणपत्र'' म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (महा.एक्स.एल.आय.१९६५) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (यामध्ये शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत).

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील ''लघुलेखक (उच्चश्रेणी)'' या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) प्राधिकरणाच्या लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदावर किमान ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांमधून आणि शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा १२० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० श.प्र.मि. ही अर्हता धारण केलेल्या व्यक्तीला पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ब) पुढील व्यक्तीमधून नामनिर्देशनाद्वारे,—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असेल; तसेच

(तीन) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा १२० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असेल.

४. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील ''लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(अ) प्राधिकरणाच्या लघुटंकलेखक या पदावर किमान ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल आणि शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा १०० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० ही अर्हता धारण केलेल्या व्यक्तीला ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ब) पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असेल; तसेच

(तीन) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा १०० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असेल.

५. प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील "लघुटंकलेखक" या पदावरील नियुक्ती पुढील व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असेल; तसेच

(तीन) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा ८० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असेल.

६. नियम ३ व ४ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनान्वये करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

७. नियम ३,४ व ५ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास किंवा भविष्यात अनिवार्य केल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

८. नियम ३,४ व ५ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

९. नियम ३,४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

१०. नियम ३,४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.७२/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ स्वीय सहायक व निवडश्रेणी लघुलेखक" या पदावरील सेवाप्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**सेवाप्रवेश नियमाचा मसुदा**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.७२/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ स्वीय सहायक व निवडश्रेणी लघुलेखक" या पदावरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

**प्रारूप सेवाप्रवेश नियम**

१. या नियमांस, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ स्वीय सहायक व निवडश्रेणी लघुलेखक, (सेवाप्रवेश) नियम, २०२०" असे म्हणता येईल.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ स्वीय सहायक या पदावरील नियुक्ती, प्राधिकरणाच्या निवडश्रेणी लघूलेखक या पदावर किमान ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल.

४. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील निवडश्रेणी लघुलेखक या पदावरील नियुक्ती, प्राधिकरणाच्या उच्चश्रेणी लघुलेखक या पदावर किमान ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तीला पात्रता व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन करण्यात येईल.

५. नियम ३ व ४ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत वेळोवेळी करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास किंवा भविष्यात अनिवार्य केल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ व ४ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"वरिष्ठ लिपिक"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ लिपिक" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "वरिष्ठ लिपिक (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अन्य अर्हता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "वरिष्ठ लिपिक" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणामध्ये कनिष्ठ लिपिक किंवा कनिष्ठ लिपिक-टंकलेखक हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्तीला पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन.

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे ;

(तीन) ज्यांना प्रशासकीय कामाचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, इतका अनुभव आहे.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनान्वये करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"कनिष्ठ लिपिक-टंकलेखक"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "कनिष्ठ लिपिक-टंकलेखक" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "कनिष्ठ लिपिक-टंकलेखक (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता.

(ड) "शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासकीय परीक्षा मंडळाचे टंकलेखनाचे किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र असून, यात शासनाने या प्रयोजनार्थ मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेल्या प्रमाणपत्राचा समावेश होतो ;

(ई) "गट ड" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " वर्ग-४ किंवा गट-ड".

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " कनिष्ठ लिपिक-टंकलेखक" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व गट-ड पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खालील खंड (ख) मधील उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य अशा व्यक्तीस पदोन्नती देऊन :

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल ; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे ; आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे ;

किंवा

(ग) अनुकंपा तत्त्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवाराची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीने ;

किंवा

(घ) गट-क मधील वाहनचालक या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व लिपिक-टंकलेखक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तीमधून, ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या कायमस्वरूपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहनचालक या पदावरून नियुक्ती दिलेल्या व्यक्तींची लिपिक-टंकलेखक पदावरील सेवाज्येष्ठता लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल ;

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ४०:५०:१० असे राहील :

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पदोन्नतीचे व वाहनचालकामधून कायमस्वरूपी बदलीचे प्रमाण शिथिल करून उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास) उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **"सहायक"** या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "सहायक" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे:—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "सहायक (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अन्य अर्हता.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "सहायक" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणामध्ये वरिष्ठ लिपिक हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्तीला पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन ;

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे ;

(तीन) ज्यांना प्रशासकीय कामाचा पाच वर्षापेक्षा कमी नसेल, इतका अनुभव आहे.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनान्वये करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा (आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

c|15



## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मीळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी" या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) 'शासन' म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) 'प्राधिकरण' म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६(सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अन्य अर्हता

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणामध्ये सहायक हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्तीला पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे :—

(एक) ज्या उमेदवारांचे वय १९ वर्षांपेक्षा कमी नसेल, आणि खुल्या वर्गातील उमेदवारासाठी ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षांपेक्षा जास्त नसेल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे; आणि

(तीन) ज्यांनी व्यवसाय व्यवस्थापन (Business Management) मधील वाणिज्य व वित्त मधील (Marketing and Finance) पदवी/ पदविका धारण केलेली आहे ; आणि

(चार) ज्यांना वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे/ नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी/फर्म मधील कार्यालयात वाणिज्य व वित्त क्षेत्राचा प्रशासकीय कामाचा ५ वर्षाचा अनुभव आहे.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनान्वये करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, विभागीय परीक्षा ( आवश्यक असल्यास), उत्तीर्ण केली नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल तर, सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

८. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "उप मुख्य अधिकारी" या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दिनांक २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८८/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "उप मुख्य अधिकारी" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "उप मुख्य अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महा. अधि. २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

(क) "पदवी" याचा अर्थ सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अन्य अर्हता

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "उप मुख्य अधिकारी" या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल :—

(क) प्राधिकरणामध्ये मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी हे पद धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींना त्या पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्तीला पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देऊन;

किंवा

(ख) शासनाच्या अवर सचिव किंवा समकक्ष पदावर व वेतनश्रेणीवर कार्यरत असणा-या अधिकाऱ्यामधून, शासनाच्या प्रतिनियुक्ती धोरणानुसार तसेच विभागाने वेळोवेळी शासन निर्णय/ परिपत्रक/ आदेश इत्यादी अन्वये विहित केलेल्या प्रतिनियुक्तीच्या कार्यपद्धतीनुसार प्रतिनियुक्तीने.

शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागाकडून अथवा कार्यालयाकडून या पदावर गृहनिर्माण विभागाच्या मान्यतेशिवाय/ संमतीशिवाय परस्पर नियुक्ती देता येणार नाही.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व प्रतिनियुक्तीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ७५:२५ असे राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी ठरविल्यानुसार प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणंत्याही मंडळात/ कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २०२०

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.८७/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्या बाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम,१९७६ च्या कलम ४९ अन्वये शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "विशेष भू-संपादन अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ" या पदावरील सेवा प्रवेश नियम विनियमित करणाऱ्या नियमांचा पुढील मसुदा, उक्त अधिनियमाच्या कलम १८४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तिंच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा शासनाकडून दि. २० ऑक्टोबर, २०२० रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तिकडून ज्या हरकती वा सूचना प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकास किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील, त्या हरकती वा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### सेवा प्रवेश नियमाचा मसुदा

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र. ८७/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "विशेष भू-संपादन अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ" या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील "विशेष भू-संपादन अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (सेवा प्रवेश) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

